महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ७ अन्वये घेण्यात येणाऱ्या ग्रामसभेच्या आयोजनास स्थगिती देणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक-ग्रापनी २०२०/प्र.क्र.२०/पंरा-२.**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई ४०० ००१
दिनांक : १२ मे, २०२०.

वाचा :- 1.Ministry of Home Affairs (MHA) Order No.40-3/2020-DM-I (A) Dated 15th April 2020, 19th April 2020, 21st April 2020, 24th April 2020 and 1st May 2020.

2. Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai-400 032 Order No. DMU/2020/CR.92/DisM-1, 2nd May 2020.

3 . सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन अधिसुचना क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दि. १४ मार्च, २०२०

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा मुंबई अधिनियम क्र.३) च्या कलम ७ नुसार प्रत्येक वित्तीय वर्षात निदान चार ग्रामसभांचे आयोजन बंधनकारक आहे. अशाप्रकारे ग्रामसभेचे आयोजन न केल्यास संबंधित सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द कार्यवाही करणेची तरतूद आहे.

सद्य:स्थितीत कोरोना विषाणु कोविड-१९ हा आजार वैश्विक महामारीच्या स्वरुपात संपूर्ण जगामध्ये पसरलेला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने या आजाराच्या विरुध्द लढ्यामध्ये मार्गदर्शक सुचना सर्व देशांना दिलेल्या आहेत. भारतामध्येही या विषाणुचे संक्रमण झालेले असून महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये सदर विषाणुचा प्रार्दुभाव झपाट्याने वाढत आहे. सदर विषाणूच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने उपरोक्त संदर्भात नमूद केलेले आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशांच्या अनुषंगाने ग्रामसभेच्या आयोजनाबावत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन परिपत्रक :-**

आपत्ती निवारण कायदा, २००५ नुसार व उक्त संदर्भिय शासन आदेश १ व २ मधील शासनाच्या मार्गदर्शन सुचनेनुसार साथरोग नियंत्रणासाठी केंद्र शासनाच्या उक्त आदेशानुसार सर्व प्रकारच्या सामाजिक, राजकीय सभा व संमेलनांवर बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.३ आदेशामधील प्रसिध्द करण्यात आलेल्या नियमावलीतील मुद्दा क्र.१० (ई) नुसार क्षेत्रातील शाळा, कार्यालये, सिनेमागृह, नाट्यगृह, जलतरण इत्यादी ठिकाणी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने सामुदायिक कार्यक्रमास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

Scanned with CamSca

आपत्ती निवारण कायदा, २००५ मधील कलम ७२ मधील तरतूदी नुसार केंद्र व राज्य शासनाचे सदर आदेश हे इतर कायद्यातील या आदेशाशी सुसंगत नसलेल्या तरतूदींवर अधिलिखित प्रभावाने (Overriding effect) लागू आहेत. यास्तव राज्यातील कोविड-१९ च्या संसर्गजन्य आजारामुळे असणारी आपत्कालीन स्थिती लक्षात घेता ग्रामसभेमध्ये असणारी ग्रामस्थांची उपस्थिती व त्यामुळे होणारी गर्दी ही आजाराच्या प्रार्दुभावाच्या दृष्टीने योग्य नाही. सद्यस्थितीत ग्रामसभा घेतल्यास या आजाराचा अधिक फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे केंद्र व राज्य शासनाचे आदेश हे अशा प्रकारच्या सभा घेण्यास प्रतिबंध करतात. त्यामुळे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा मुंबई अधिनियम क्र.३) च्या कलम ७ नुसार ग्रामसभा घेण्यास पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती देण्यात येत आहे.

सदर आदेश हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल व परिपत्रकाच्या दिनांकापासून एक वर्ष किंवा पुढील आदेशापर्यंत लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ए.का. गागरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत-

१. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/ सचिव
५. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
६. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
७. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
८. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक.
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१३. सर्व उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१४. सर्व उपायुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय
१५. सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)जिल्हा परिषद.
१६. निवडनस्ती ( कार्यासन पंरा-२ ).

Scanned with CamSca